महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(२)/२०१९/तेवीस दिनांक : ०६ जुलै, २०२२.

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

विषय:-महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०१९- सहायक कक्ष अधिकारी पदाचा प्रतिक्षायादीच्या दुसऱ्या टप्प्याचा निकाल
संदर्भ:-जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्रमांक १०/२०१९

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २८ जुलै, २०१९ व दिनांक २५ ऑगस्ट, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ च्या सहायक कक्ष अधिकारी संवर्गाचा सुधारित अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने आयोगाने सहायक कक्ष अधिकारी या संवर्गासाठी शिफारस केलेल्या एकूण २४ उमेदवारांपैकी मंत्रालयीन विभागातील ७ व आयोगाच्या कार्यालयातील १ उमेदवारांनी नियुक्ती न स्विकारल्यामुळे प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील गुणवत्ताक्रम, वर्गवारी व शासनाने कळविलेल्या रिक्त प्रवर्गनिहाय पदे इत्यादी बाबी विचारात घेऊन मंत्रालय विभागातील ७ पदे व आयोगाच्या कार्यालयातील १ पद अशा एकूण ८ पदांवर प्रतिक्षा यादीतून एकूण ८ उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती. त्या अनुषंगाने आयोगाच्या दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये विषयांकित परीक्षेच्या प्रतिक्षा यादीमधून (पहिल्या टप्प्यामध्ये) ८ उमेदवार उपलब्ध करुन देण्यात आले होते.

**२.** आयोगाच्या दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ८ उमेदवारांचे मंत्रालयीन विभागात ७ व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी १ असे नियतवाटप केले असता मंत्रालयीन विभागातील ३ उमेदवारांनी नियुक्ती स्विकारली नाही. तसेच सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा-२०१९ या परीक्षेच्या मूळ शिफारस यादीतील २ उमेदवारांनी शासन सेवेतील नियुक्ती स्वीकारुन सेवा सोडून गेले. त्यामुळे सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा-२०१९ च्या प्रतिक्षायादीतील नियुक्ती न स्विकारणारे ३ उमेदवार व मूळ शिफारस यादीतील नियुक्ती स्विकारुन सेवा सोडून गेलेले २ उमेदवार असे एकूण ५ उमेदवार प्रतिक्षायादीतून उपलब्ध करुन देण्याची शासनाने विनंती केली आहे. त्या अनुषंगाने आयोग, प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील गुणवत्ताक्रम, वर्गवारी व शासनाने कळविलेल्या रिक्त प्रवर्गनिहाय पदे इत्यादी बाबी विचारात घेऊन मंत्रालय विभागातील एकूण ५ पदांवर उमेदवारांची त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या प्रवर्गातील आरक्षित जागांसाठी शिफारस करीत आहे. सदर प्रतिक्षायादीनुसार शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल, उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत प्रतिक्षायादीनुसार नियुक्तीस शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासतांना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेची प्रतिक्षायादी समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

५. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांनी वयोमर्यादेतील सवलतीकरीता तद्अनुषंगिक प्रमाणपत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे अनिवार्य राहील.

६. सदर पदाच्या निकालात, गुणवत्ता यादीत तसेच शिफारस यादीत उमेदवारांचा संयुक्त प्रश्नपत्रिका क्रमांक १ शी निगडित बैठक क्रमांक व प्रश्नपत्रिका क्रमांक २ शी निगडित बैठक क्रमांक हे दोन्ही बैठक क्रमांक नमूद करण्यात आले आहेत.

७. विषयांकित परीक्षेच्या गुणवत्तायादीमधील उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता उमेदवारांनी अर्जात केलेले दावे विचारात घेऊन निश्चित करण्यात आली आहे. शिफारसपात्र उमेदवार वगळता अन्य उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता ही अर्जातील त्यांच्या दाव्यांच्या आधारे तपासण्याच्या अधीन राहून सदर गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.